ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - VIII Issue - I Marathi Part - III January - March - 2019

Peer Reviewed Referred and UGC Listed Journal

Journal No. 40776

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING
2018 - 5.5
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖
Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.),
M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

Scanned with CamScanner

VOLUME - VIII, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2019
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

# CONTENTS OF MARATHI PART - III



| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | जागतिकीकरण आणि भारतीय स्त्री<br>**प्रा. जयश्री अभिमन्यू डंके** | १-४ |
| २ | मराठी कथेची सद्यस्थिती<br>**डॉ. हंसराज जाधव** | ५-७ |
| ३ | समकालीन ग्रामीण साहित्य प्रवाह (कविता, कादंबरी, नाटक)<br>**प्रा. डॉ. संजीवकुमार सूर्यकांत पांचाळ** | ८-१३ |
| ४ | समकालीन साहित्य प्रवाहाची सद्य:स्थिती<br>**डॉ. निशिकांत आल्टे** | १४-१९ |
| ५ | शरद पवार यांचे महाराष्ट्रातील सामाजिक व राजकीय योगदान<br>**प्रा. कालिदास पंढरीनाथ चौधरी** | २०-२५ |
| ६ | दलित रंगभूमी : वेदनांचा दाहक लोकधर्मी नाट्याअविष्कार<br>**प्रा. नीरज बोरसे** | २६-३१ |
| ७ | दलित साहित्य समीक्षेची सद्यस्थिती<br>**डॉ. शरद आसाराम खांडेभराड** | ३२-३७ |
| ८ | जगदीश कदम यांच्या कवितेतील व्यक्तीरेखा<br>**प्रा. गोरोबा शेषराव रोडगे** | ३८-४१ |
| ९ | प्रजा : एक वीरशैव कादंबरी<br>**प्रा. ज्योती शांतितीर्थ स्वामी** | ४२-४६ |
| १० | शेतकऱ्यांचे यातनामय जीवन आणि मराठी ग्रामीण कविता<br>**डॉ. दैवत दि. सावंत** | ४७-५० |
| ११ | समाजजीवनाचे वास्तव दर्शन : 'प्रतिबिंब'<br>**प्रा. डॉ. नारायण शिवशेट्टे** | ५१-५४ |
| १२ | क्रांतीचे रसायन : आता क्रांती दूर नाही<br>**प्रा. संजय बन्सीधरराव कसाब** | ५५-६१ |
| १३ | बाबुराव गायकवाड यांच्या झळ व आग या कादंबऱ्यांतील समाजजीवन<br>**डॉ. सदाशिव सरकटे** | ६२-६८ |
| १४ | स्त्रीलिखित मराठी कादंबरी<br>**प्रा. डॉ. विजय गणपतराव वारकड** | ६९-७३ |



Scanned with CamScanner

# १३. बाबुराव गायकवाड यांच्या झळ व आग या कादंबऱ्यांतील समाजजीवन

डॉ. सदाशिव सरकटे
सहायोगी प्राध्यापक व विभाग प्रमुख, कला व विज्ञान महाविद्यालय, शिवाजीनगर, गढी.

कादंबरी हा वाङ्‌मयप्रकार समाजवास्तवाशी अधिक जवळ जाणारा असून आधुनिक मूल्यसरणीतून व्यवस्थेची चिकित्सा करण्यासाठी प्रभावी ठरत आहे. कादंबरीतून जीवनाच्या सर्वच पैलूंचे कमी अधिक प्रमाणात दर्शन घडविता येते. प्रारंभीच्या काळात कादंबरी काही प्रमाणात केवळ रंजनात रमली होती. त्यावेळी कल्पकतेला अधिक महत्त्व देऊन वास्तवता गौण ठरवण्याची प्रथा होती. तेव्हा समाज गतिरोध झालेला होता. जगण्याच्या गरजांची गोळाबेरीज करण्यात सामान्य समाज गुंतलेला होता. पारतंत्र्यातून स्वातंत्र्याची वाटचाल, अज्ञानाच्या दालनात ज्ञानाची फडफडणारी पाने व त्या ज्ञानप्रकाशाच्या झंझावातात जागा झालेला बहुजनसमाज कालपरत्वे आपली कूस बदलू लागला. समाजबदलाचे संकेत बहुजन समाजालाही बाह्यजगातून मिळू लागले. एका युगप्रवर्तक अशा जगाचा उदय सृष्टीवर होऊ लागला. कपोलकल्पित बालबोध व इसापनीतीवर आधारित असलेले अनुमान भूतकाळात जमा होत गेले. जीवनातील सत्य, वास्तव घटनांवर आधारित नवे युगभान, प्रतिमा व प्रतिभांसह साहित्यात रुढ होऊ लागले. स्वातंत्र्योत्तर काळात सामान्य माणसांच्या जगण्याची चौकट पुन्हा नव्याने रुंद होत गेली. सामाजिक संक्रमण व प्रबोधनाची प्रक्रिया वेगाने होऊ लागली. नव्याविचाराने भारावलेले विचारवंत सामाजिक परिवर्तनाची नव्याने मांडणी व मागणी करु लागले. त्या विचारवंतात डॉ. बाबसाहेब आंबेडकर यांचे नाव प्रामुख्याने घ्यावे लागेल. १९५६ नंतरच्या कालखंडातील दलित लेखकांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रेरणेने दीन-दलितांना स्वातंत्र्याचा नवा मंत्र व अर्थ शिकविला. त्यामुळे समता, न्याय व बंधुत्वाची नवी ज्योत समाजात प्रकाशित होत गेली. दलित, दुबळे, मागासलेले, आदिवासी, शेतकरी व गावकुसाबाहेरच्या जगातील नवे आत्मभान आलेल्या नवलेखकांनी साहित्याला शस्त्र माणून भोवतीच्या वास्तवाची धारदार चिकित्सा करण्यास सुरुवात केलेली आढळते.

दलित साहित्य हा वाङ्‌मयप्रकार १९५६ च्या मागे-पुढे सुरु झालेला आढळतो. मराठी साहित्य प्रांतात कथा, कविता, कादंबरी, नाटक व आत्मकथनात आपल्या वेगळ्या भावभावनांसह, अनोख्या जीवननिष्ठा घेऊन दलित साहित्य समृध्द होत आहे. सांस्कृतिक व सामाजिक परिवर्तनासाठी विद्रोही शब्दांतून हे साहित्य निर्माण झाले. या साहित्याने खाईत पडलेल्या असंख्य जीवांना शब्द व भाषा पुरविली. स्वातंत्र्य व समतेचा उद्‌घोष केला व त्यातून सक्षम, मानवप्रेमी वाङ्‌मय, असा नवा आयाम या साहित्याला प्राप्त झाला. एका उठावाला नवा जन्म देण्याइतपत हे साहित्य माणूसप्रेमी ठरले आहे. दलित साहित्याने माणसांचे खरे चेहरे व दलितांचे भीषण जग रेखाटले. या साहित्याने अखिल भारतीय माणसांच्या दृष्टीला नवे भावरुप मिळवून दिले. केवळ जातीबंधनात अडकून न पडता संस्कृतीने अपहरण केलेल्या असंख्य माणसांचे पूर्ण व्यवस्थापन केले व मानवी मूक हुंकार साहित्यातून अभिव्यक्त केला आहे.



Scanned with CamScanner

अण्णाभाऊ साठे, बाबूराव बागुल, बंधू माधव व शंकरराव खरात या पहिल्या पिढीच्या साहित्यिकांनी दलित साहित्याचा पाया भक्कम केला. उत्तम बंडू तुपे, केशव मेश्राम, दया पवार, वामन होवाळ, योगेंद्र मेश्राम, योगीराज वाघमारे, माधव कोंडविलकर, अशोक व्हटकर व ना.चं.कांबळे या लेखकांनी अस्पृश्यातील विविध जाती व जमातींचा संघर्ष साहित्यातून उभा केला आहे. डॉ.आंबेडकरांनी मानवमुक्ती संघर्ष, जातपात मोडक भूमिका व चुकीच्या धर्मव्यवस्थेविरुध्द जी बंडखोरी केली, त्यातून नवमूल्यात्मक विचार समाजात रुजला. वतनदारी, गुलामगिरीच्या बेड्या तोडण्यासाठी त्यांचे हे क्रांतीकार्य युगप्रवर्तक ठरले. अण्णाभाऊ साठे यांनी वारणा व सह्याद्रीच्या खोऱ्यांतील माणसांचे लढवय्ये जग उभे केले. गावगाडा, वेठबिगारी, जातीवाद, सामान्यांची दुर्दशा अण्णाभाऊ साहित्यातून मांडतात. मानवी अस्तित्वाचा मूलभूत विचार फकिरा व राणोजींच्या व्यक्तिमत्त्वातून अण्णा भाऊंनी अजरामर केलेला आहे.

डॉ. बाबुराव गायकवाड यांनी वाङ्मयातील विविध प्रवाहांतून लेखन केलेले आहे. कथा, कादंबरी, कविता, नाटिका, समीक्षा, चरित्र, ललित लेख, आत्मकथन, अनुवाद, संपादन इ. विपुल सक्षम लेखन केलेले आहे. समाजाच्या गतिरोधाला बाजूला सारणारे विचार ही त्यांची लेखनीय प्रकृती आहे. तोच त्यांचा धर्म व तीच निष्ठा अंगी बाळगून साहित्य प्रांतातील त्यांची मुशाफिरी प्रगतीशील विचारांची पाठराखण करणारी आहे. बाबुराव गायकवाड यांनी आपल्या लेखनातून प्रश्नांची चिकित्सक मांडणी केली. ज्या समाजात ते जगले, वाढले त्याच समाजाच्या प्रश्नांची त्यांनी जाणीवपूर्वक मांडणी केलेली आहे. ते दलित जाणिवांना मोठ्या प्रमाणात साहित्यात उजर करण्यात यशस्वी झालेले आहेत. परिवर्तनवादी लेखकाला प्रवाहाविरुध्द उभं राहून समाजाच्या गतीचा सिध्दांत मांडावा लागतो. त्यादृष्टीने बाबुराव गायकवाड यांनी समाजाच्या विविधांगांचा अभ्यास केलेला आहे. डॉ. गायकवाडांनी दोनच पण अत्यंत दर्जेदार अशा कादंबऱ्या लिहिलेल्या आहेत. त्यांच्या कादंबऱ्यांचा अनेकविध दृष्टीने विचार करता येण्यासारखा आहे. त्यांच्या कादंबऱ्यातून एका समन्वयवादी विचारवंताचे दर्शन सातत्याने वाचकांना घडते.

डॉ.बाबुराव गायकवाड यांनी दोन्ही कादंबऱ्यातून महत्त्वपूर्ण लेखन केलेले आहे. त्यात ग्रामीण जीवनाचा वेचक व वेधक असा इतिहास मांडलेला आहे. हा इतिहास मांडताना शोषित-पीडित यांच्यातील अंतर्गत संघर्ष, दलित-दलितेतर संघर्ष व मराठवाडा विद्यापीठाला डॉ.आंबेडकरांचे नाव देण्यात यावे, यासाठी उभा झालेला संघर्ष पाहिलेला आहे. यासाठी त्यांनी आपल्यातील लेखक जागा ठेवला आहे. मराठी भाषेबद्दल त्यांचा अभिमान व महाराष्ट्राच्या सीमेपलीकडे कोसोदूर असूनही व मराठी अभाषिक प्रदेशात राहूनही त्यांनी मराठी भाषेची अविरत सेवा केलेली आहे. अजूनही करत आहेत.

बाबुराव गायकवाड यांनी झळ (१९८०) व आग (१९९६) या कादंबऱ्यांतून दलित व ग्रामीण जीवनाचे चित्रण केलेले आहे. झळ आणि आग या कादंबऱ्यांतील आशयसूत्र हे अण्णा भाऊ साठे यांच्या कादंबरीशी नाते जोडणारे वाटते. दलित व शोषित जीवनाचे आणि त्यांच्या उद्ध्वस्त झालेल्या वाड्या-वस्तींचे विदारक दर्शन त्यांतून त्यांनी घडविले आहे. भारतातील ग्रामीण भागात (खेड्यात) वर्षानुवर्षे दलितांसोबत सक्ता-सुभा म्हणून पोसल्या गेलेल्या व गावकुसाबाहेर जगणाऱ्या या समाजाचे सर्व जीवनसंदर्भ व्यवस्थेने शिलबंद केलेले आहेत. गतानुगतिकता जोपासत कर्मठवाद्यांनी सर्वसामान्यांचे जगणे नाकारले आहे. गावगाड्यात परंपरागत चालत आलेली अमानुष पध्दती, सामूहिक बहिष्कार, दलित स्त्रियांच्या अगतिकतेचा फायदा घेत



Scanned with CamScanner

त्यांच्यावर केलेल्या अन्वयित अत्याचारांतून, त्यांचा लिलाव मांडत समाजाचा हा महत्त्वाचा घटक पूर्णपणे समाजबाह्य करण्याचा डाव आखल्या गेला. यादृष्टीने झळ आणि आग या दोन्ही महत्त्वाच्या कादंबऱ्या आहेत. आग ही कादंबरी डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या अभ्यासक्रमाला नेमलेली होती. दलित, ग्रामीण जीवनाचा वेधक व वेचक इतिहास मांडत असताना शोषित-पिडीतांमधील अंतर्गत संघर्ष, दलितांतर्गत संघर्ष, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे नाव मराठवाडा विद्यापीठाला देण्यात यावे, यासाठी झालेले आंदोलन याचा अनुभव गायकवाडांनी घेतला. गावातील गावगाडा उभा करताना जातीअंतर्गत संघर्षाला वाचा फोडली व ग्रामीण जीवनाचे विविध कंगोरे त्यांनी उलगडून दाखविले. बुध्द, फुले, शाहू, आंबेडकर, अण्णा भाऊ साठे यांच्या विचारांनी प्रभावित झालेले त्यांचे मन, समाजाच्या स्थितीगतीचा आढावा घेण्यासाठी सक्षम आहे. आग मध्ये महार, मांग, चांभार, लोहार, मुसलमान व न्हावी या सर्व जातींच्या, एकत्रिकरणाचे चित्रण आलेले आहे. डॉ.बाबुराव गायकवाड यांना समता निर्माण करावयाची आहे. झळ आणि आग यांतून त्यांना अभिप्रेत असलेला पुरोगामी विचार अधिक प्रखरपणे अभिव्यक्त होतो. या दोन्ही कादंबऱ्यांत दलित-शोषित जीवनाचे आणि त्यांच्या उद्ध्वस्त कुटुंबाचे चित्रण आलेले आहे.

या दोन्ही कादंब-यांतील नायक मातंग समाजाचे आहेत. शेशू (शेश्याद्री उमापुरे) हा झळ या कादंबरीतील नायक आहे. चंद्रा हे त्याचे वडील. सोमी ही बहीण. मोठा भाऊ आई रंभा. मातंग मोहल्ल्यात असावे, असे हे लहान कुटुंब आहे. रंभा ही शेशूची आई, परंतु तिच्या वर्तनामुळे कुटुंबाची झालेली वाताहत प्रभावीपणे मांडलेली आहे. शेशूच्या महाविद्यालयीन जीवनापासून कादंबरीला प्रारंभ होतो. बी.ए. चे शिक्षण संपल्यानंतर चार वर्षांनी तो गावात येतो. नोकरीसाठी प्रयत्न करतो, परंतु नोकरी मिळत नाही. शेशूच्या घराशेजारी अण्णाचे कुटुंब राहते. जमुना ही अण्णाची बायको. त्यांची चिमी नावाची मोठी व रुना नावाची लहान मुलगी असल्यामुळे, या कुटुंबाला शेशूचा बाप खालच्या दर्जाचा समजतो. समाजाच्या दृष्टीनेही हे हलक्या दर्जाचे कुटुंब ठरते. या दोन्ही कुटुंबाला लागलेली झळ हा या कादंबरीचा विषय आहे.

या समाजात कमालीची अंधश्रध्दा पाळल्या जातात. वेळप्रसंगी पोटाची खळगी भरण्यासाठी दरोडे घालावे लागतात. मुलाच्या शिक्षणाची आबाळ असते. दुःख, दारिद्रय व उपासमारीपोटी मेलेल्या जनावरांचे मास खाणे दलितांच्या वाट्याला येते. पावसाळ्यात कामधंदा बंद असल्यामुळे तरवट्याच्या पाल्यावर गुजराण करावी लागते. चारही बाजूने कोंडी झाल्यामुळे दलित स्त्रियांच्या मजबुरीचा धनदांडगे फायदा उचलतात. अशा दृष्टचक्रात ही दुनिया सापडलेली आहे. शेशूची माय रंभा. हिचे वर्तन समाज चौकटीबाहेरचे आहे. शारीरिक सुखाच्या अभिलाषेने चटावलेल्या रंभामुळे कुटुंबाचे झालेले मानसिक शोषण व नरकातून कुटुंबाला व समाजाला बाहेर काढण्यासाठी धडपडणारा शेशू कादंबरीत चित्रित होतो. बी.ए. पास झाल्यानंतर नवे विचार व जग बदलण्यासाठीची उर्जा घेऊन तो गावात येतो व गावाला गावपण मिळवून देण्याचा प्रयत्न करतो. शेशूच्या आईचे (रंभा) अतिरिक्त शारीरिक भूक भागविण्यासाठी धोंडू दिमाखे पाटील सोबत अनैतिक संबंध असतात. ते स्त्रीजातीच्या मानभंगाचे व नैतिकतेला सुळावर चढवणारे आहेत. दिमाखे गावगाड्यात स्त्रियांच्या असहाय्यतेचा फायदा घेत गावात आपली दहशत निर्माण करतो. बाबुराव गायकवाड या ठिकाणी दीन-दलितांच्या स्त्रियांचा हा प्रश्न मांडून चीड व्यक्त करतात. गावगाड्यातील ही भयानक वास्तवता त्यांनी ओळखलेली आहे. आईचे हे अनैतिक संबंध शेशूला माहीत असूनही तो आईच्या प्रेमापोटी या संबंधाविरुध्द

बोलत नाही, परंतु त्याच्या मनात पेटलेली आग आतून पोखरत राहते. रंभाच्या क्रूरतेचा कळस म्हणजे, ती आपल्या मार्गात अडसर ठरु पाहणाऱ्या मुलीस (सोमा) विहिरीत ढकलून देते. मातेच्या निर्दयतेचे हे धक्कादायक उदाहरण होय. धोंडूला तिचे हे बेभान वर्तन पार हादरवून टाकते. धोंडू दिमाखे पाटील याच्या अत्याचाराविरोधात दलितांनी मात्र ब्र काढू नये. त्याच्या अत्याचाराला हरकत घेवू नये, ही मानसिकता आह रे म्हणणाऱ्या वर्गाकडून समाजात आजही कायम आहे.

अण्णा व धोंडू यांच्यातील बेबनावानंतर दरोडा घालण्याच्या विचाराने त्यांनी एकत्र येणे व दरोड्यात अण्णाचा नाहक बळी जाणे, या घटना कथानकाला कलाटणी देणाऱ्या ठरतात. या दुःखद प्रसंगाने अण्णाचे कुटुंब पार उद्ध्वस्त होते. या कादंबरीतील सर्वच पात्रे शापित मुद्रा घेऊन जगतात. दारिद्र्य व अंधःश्रध्देपोटी या वस्तीतील माणसांना क्षेणोक्षणी हालअपेष्टांना तोंड द्यावे लागते. मृत अण्णांची मुलगी रुना शाळेतून एकटी परत येत असताना गावपाटलाचा गावगुंड मुलगा तिच्या असहाय्यतेचा फायदा घेत तिच्यावर पाशवी बलात्कार करतो. त्याच्या पापाचे फळ तिच्या पोटात अंकुरते, तेव्हा चारही बाजूने कोंडी झाल्यामुळे ती आत्महत्येसाठी प्रवृत्त होते. आपल्या पोटात वाढत असलेला पापाचा अंकुर नष्ट करण्यासाठी ती स्मशानात येते, तेव्हा मृत वडिलांच्या विझत चाललेल्या सरणाजवळ आक्रोश करणारा शेशू एकाकीपणे वैतागग्रस्त व भावव्याकुळ अशा अवस्थेत बसलेला आहे. शेशू आणि रुना यांच्या दुःखाचा हा प्रसंग दोघांनाही एकत्र आणतो. आकांताने विव्हल झालेले है दोन दुःखी जीव एकत्र येतात, ते नव्या जीवनाचे स्वप्न व नवे भान घेऊन. ते आपल्या विस्कटलेल्या स्वप्नभंगाची नव्याने जुळवणी करतात.

या कादंबरीतील नायक शेशू हा समाजवादी विचाराने प्रभावित झालेला तरुण आहे. सर्व जातीधर्मांतील माणसांनी एकतेने नांदावे व त्यातून समतेचा ध्वज उभा राहावा, या विचाराने भारलेला शेशू आपल्या भोवतीच्या सर्व स्तरांतील माणसांना माणुसकीची शिकवण देतो. भारत सरकारच्या शिष्यवृत्तीवर शिक्षण घेऊन विचारांची उंची गाठलेला शेशू हा वाचन व लेखनाचा छंद जोपासतो. डॉ.आंबेडकरांचे विचार हे त्याच्या जीवनमार्गावर मोठा आदर्श आहे. त्याचा विद्रोह हा संयमी आहे. मतपरिवर्तनावर भर देण्याइतपत तो विचारी आहे. त्यामुळे समाजात ठाण मांडून बसलेल्या अनिष्ट रुढी, परंपरा, प्रथा प स्पृश्य-अस्पृश्यता याला मुळापासून काढून टाकण्याची जिद्द त्याच्या ठिकाणी आहे. तसेच एका निकोप समाजाची गुढी उभारण्याची शेशूची तयारी असून या समाजात कोणत्याही भेदभावाला थारा न देता केवळ स्त्री व पुरुष याच दोन जाती महत्त्वाच्या आहेत, असा प्रगल्भ विचार तो आचरणात आणतो.

डॉ.बाबुराव गायकवाडांच्या 'आग' या कादंबरीचा नायक मधू हा मातंग समाजाचा उच्चशिक्षित तरुण आहे. प्राथमिक व विद्यालयीन शिक्षण पूर्ण करुन तो घाट या तालुक्याच्या ठिकाणी येतो, त्या काळी खेड्यात जातीवाद मोठ्यात प्रमाणात उफाळून आल्यामुळे दलितांना त्याचे चटके बसतात. अस्पृश्यतेचे हे चटके मधूलाही लहानपणापासूनच बसतात. भाकरीचा प्रश्न दलितांसमोर व गोरगरीब माणसांसमोर आ वासून उभा असतो. धावडी गावातील स्पृश्य, सवर्णीय दलितांना आपले गुलाम समजतात. मधू उच्च शिक्षणासाठी उमापूरला गेल्यानंतर शहरी भागात दलितांच्या ज्या चळवळी मूळ धरु लागल्या त्याचाही प्रभाव मधूवर पडतो व समाज सुधारणेचे वारे त्याच्या कानात शिरते. डॉ.आंबेडकरांचा आदर्श डोळ्यांपुढे ठेऊन सामाजिक



Scanned with CamScanner

प्रबोधनाच्या कार्यात तो स्वतःला झोकून देतो. गावातील अनिष्ट रुढी व परंपरा बंद व्हाव्यात, यासाठी मधूचे प्रयत्न असतात. त्यामुळे गावातील विषमतेचे बुरुज जमिनदोस्त करण्यासाठी त्याने दलितांमध्ये एकीचा पुरस्कार केला, ही त्याच्या कार्याची उपलब्धी असून तो मित्र वसंताच्या सहकार्यातून सामाजिक प्रश्नांशी भिडतो. मधूने सामाजिक प्रश्न घेऊन जे काम सुरु केले, त्यात वसंता, बन्सी, चंदू ही परिवर्तनाचा विचार स्वीकारणारी मित्रमंडळी असून ते समूहाची जबाबदारी अंगिकारुन मधूला सहकार्याचा हात देतात.

मधूचा बाप संभा हा जुन्या वळणाचा असून अन्यायाचा बळी ठरलेल्या दलितांच्या पहिल्या पिढीचा प्रतिनिधी आहे. वसंता व समभावी मित्रांची शिक्षित अशी दुसरी पिढी, तर वसंताने दलितांची मुले शाळेत घालून जो नवा विचार या पिढीपर्यंत नेला, ती तिसरी पिढी होय. या तीन पिढ्यांचा संगम या कादंबरीच्या कथानकात येतो. मधू हा या तीन पिढ्यांच्या परिवर्तनाचा केंद्रबिंदू आहे. मातंग समाजाने सांस्कृतिक व शैक्षणिक क्षेत्रात पुढे यावे, यासाठी त्याचा संघर्ष आहे. त्यातून तो उमापूर व धावडी या परिसरात सुधारणेचा प्रयत्न करतो.

मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतराचा प्रश्न उग्र रुप धारण करीत असताना मधू या आंदोलनात स्वतःला झोकून देतो व मातंग समाजातील तरुणांची संघटना बांधून या आंदोलनात त्या संघटनेला तो उभी करतो, परंतु या आंदोलनातही पक्तीप्रपंच पाळला जात असून मातंग समाजातील तरुणांना नेतृत्व, प्रतिनिधीत्व मिळत नसल्याची खंत तो व्यक्त करतो.

मधू हा गावातील सर्वांच्या सुखदुःखांत सामील होत असल्यामुळे गावात त्याच्या शब्दाला मान असतो. गावातील दलितांनी लाचारीचे जीवन जगणे सोडून देऊन स्वाभिमानाने जगावे, यासाठी मधू पारवे प्रयत्न करतो, परंतु सामाजिक विषमता कायम राहावी, असा ठेका घेतलेल्या ठेकेदारांमुळेच त्याच्या सुधारणेच्या कार्यात अडथळे येतात, तरीही मधू पारवेच्या नेतृत्वात दलितांची फलटण काम करताना दिसून येते. आग मध्ये दलित-दलितेतरांचा संघर्ष, दलितांतर्गत संघर्षाचे, सवर्णांनी दलित स्त्रियांची अब्रू लुटण्याचे, गावाच्या सुधारणा करण्यासाठी झटणाऱ्या युवकांचे, मातंग आणि बौध्द यांतील वैमनस्याचे मधूच्या वाट्याला आलेले अनुभव, या कादंबरीत लेखकाने नेमकेपणाने टिपलेले आहेत.

मातंग समाजातील तरुणांनी नोकरीची समस्या, सवर्णीयांनी दलितांकडे हीनदृष्टीने पाहणे, पोटासाठी चोरी, दलितांतील मातंग व चांभार यांच्या संघटना असे अनेक प्रश्न तसेच दलितांच्या वस्तीतील माणसांना सतावणारी पाणी समस्या सोडविण्यासाठी मधू गावातील दलित सदस्यांचा अर्ज सरपंचकडे ग्रामपंचायतामध्ये सादर करतो. डॉ.आंबेडकरांची जयंती साजरी करण्यासाठी गावकऱ्यांना तयार करतो. मधू नामांतर चळवळीरत मातंग समाजातील तरुणांची संघटना उभी करतो व चांभार समाजाचा मनोहर चवरे चर्मकार विद्यार्थीची संघटना उभी करतो, तेंव्हा महार समाजाचा प्राचार्य व विद्यार्थी त्याला विरोध करतात. मधू हा सामाजिकदृष्ट्या मोठा होऊ नये, यासाठी दलितातीलच काकतकर हा विविध षडयंत्र रचतो. सवर्णातील दौंडसर, कासारसर मधूला मार्गदर्शन करण्यापलीकडे कोणतीही मदत करीत नाहीत. गावातील सरुची माय, चंदूची माय, गोदी म्हातारी, चंद्री, पंचा व सरु या विविध मनोवृत्तीच्या स्त्रिया या कथानकात येतात. चंद्री, पंचा या तरुणी व गोदी म्हातारी यांच्या देहाची विटंबना गावातील उच्चभ्रूंच्या रानटी हव्यासापायी झालेली असते. सरु ही मधूची प्रेयसी असते. तिची विटंबना व तिच्यावर



Scanned with CamScanner

अत्याचार घडवून आणण्यात पुढाकार घेणारी गोदी म्हातारी या सर्व व्यक्तिरेखा दारिद्रय, सूड, लाचारी यांचा बळी ठरल्या आहेत. सामाजिक वैमनस्य या वस्तीत नेहमीचेच आहे. दलितांच्या वस्त्यांनाआग लावणे, त्यांना गावकुसाबाहेर हाकलणे व बहिष्कार अशाप्रकारांना आळा घालण्यासाठी तसेच दाद मागण्यासाठी मधू व वसंता जागृत असतात. लुळाण्णा म्हातारा गावात कोतवाली करतो. पाटलाने सांगितलेली गाकीची कामे करतो. तो दुबळा असून, तेथील लाचार अशा दलितांचा एक प्रतिनिधी आहे.

मानवी स्वभावाचे असंख्य कंगारे या कादंबरीत दिसून येतात. खेड्यातील दलितांची आपसी झुंज, वाद-विवाद यात सज्जनांचा जागोजागी मुडदा पडतो. रंगी-ढंगी माणसांची ही दुनिया सभ्यतेचे बुरखे फाडणारी आहे. लग्नानंतर नवऱ्याच्या घरुन परत माहेरी आलेली चंद्री, गावातील युवकांना वासना तृप्तीसाठी बळी पाडणारी अविवाहित चंपा, शीलभंग झालेली सरु अशी अनेक उदाहरणे सामाजिकदृष्ट्या अतिशय स्फोटक ठरतात. या सर्व प्रश्नांना सोडविताना दुष्ट प्रवृत्तींच्या माणसांच्या मनास चांगल्या संस्कारांचे धडे देण्यासाठी मधू सातत्याने पुढे सरसावतो. मात्र समाजातून त्याला वेळोवेळी मोठ्या प्रमाणात होणारा विरोध सहन करावा लागतो.

मातंग समाज हा पापभिरु व भयग्रस्त आहे असे चित्र जागोजागी प्रदर्शित झाल्यामुळे आजपर्यंत देश घडविण्यासाठी या समाजाने जे कष्ट उपसले, त्याची दखल तथाकथितवाद्यांनी घेतली नाही. इतिहासात त्यांच्या कार्याची नोंदही नाही. मधू हा प्राचार्यांकडे पावतीपुस्तक घेऊन वर्गणी मागायला जातो, तेव्हा मातंग समाजाचे विद्यार्थी त्याच्या सोबत येतात, पण दूर उभे राहतात. यातून या समाजाच्या मानसिकतेत हे सातत्याने बिंबविले गेले आहे, की त्याने आपली पायरी सांभाळून राहावे. अशाप्रकारच्या निष्क्रियतेवर मधू तुटून पडतो. तो रणांगणातील एखाद्या योध्याप्रमाणे लढत असतो.

आग मधील मधू आणि झळ मधील शेशू या दोन्ही मातंग नायकांचे विचार व त्यांचे समाजातील कार्य तपासले, तर मधू हा शेशूपेक्षा अधिक निर्भिड आहे असे दिसते. शेशू हा सामाजिक सुधारणा घडवून आणण्यासाठी फारसे प्रयत्न करताना दिसत नाही. त्याच्या सभोवती ज्या ज्या घटना घडतात, त्यांचा तो केवळ एक साक्षीदार असतो. कविता लिहिणे, महाविद्यालयीन उपक्रमात भाग घेणे, एवढ्यापुरता त्याचा विचार मर्यादित आहे. या दोन्ही कादंबऱ्यांत दलितांच्या वाटयाला आलेले शोषण व भयग्रस्तता जागोजागी दिसून येते तसेच दलित स्त्री ही दोन्ही कादंबऱ्यांतून सवर्णांची मालमत्ता म्हणूनच पुढे येते तसेच दलित स्त्री अधिक आक्रमक, बाणेदार, निर्भिड म्हणूनही ती वाचकांना विचारप्रवृत्त करते. समाजात घडणाऱ्या अन्याय-अत्याचाराला बळी पडताना या गर्तेतून स्वत:सोबतच इतरांना बाहेर काढण्यासाठी चाललेले मधूचे एकूणच प्रयत्न हे प्रेरणदायी व दलितांना नवे भान आणून देणारे आहेत. नामांतर आंदोलनातीलन तत्कालीन पेटते प्रश्न आग मध्ये बाबुराव गायकवाड यांनी मांडले आहेत. ही त्यांची कादंबरी या आंदोलनावरील महत्त्वाचे मापक ठरते. डॉ.गायकवाडांनी संपूर्ण सामाजिक स्थितीत मुळापासून बदल करण्याचा विचार मांडला आहे. या देशात ठाण मांडून बसलेला जातीयतेचा चिरेबंद वाडा उद्ध्वस्त करण्यासंदर्भात त्यांचे विचार आक्रमक आहेत. ते समाजाच्या वास्तवतेचा विचार करतात.

डॉ.गायकवाड हे समताधिष्ठित समाजव्यवस्था निर्माण करण्याचे स्वप्न पाहतात. त्या अनुषंगाने त्यांचे कादंबरीतील सर्व विचार नव्या निष्ठेतून साकार झालेले आहेत. यादृष्टीने झळ कादंबरीतील शेशू व रुना यांच्यातील संवाद यादृष्टीने महत्त्वाचा



Scanned with CamScanner

आहे. आम्ही एकमेकांना पसंत केलंय आता आम्ही लग्न करणार आहोत. त्यावर जमुना परं..... म्हणण्याअगोदरच, मी तिच्या तोंडावर हात ठेवून म्हणालो, ''लाखो वर्षांपासून चालत आलेल्या खालच्या पायरीला आम्ही जपणार नाही, हीच एक आमची एकजूट आहे. आमच्यामागून येणारी बाळे पूर्वग्रह सोडून चांगले वागतील''. या संवादातील त्याचे प्रगल्भ विचार समाजात बदल घडवून आणण्यासाठी महत्त्वपूर्ण आहेत असे म्हणता येते.

त्यांच्या आग या कादंबरामध्ये दलितचित्रणासोबत संपूर्ण ग्रामीण जीवनाचा पसाराही उत्कटपणे प्रतिबिंबित झालेला आहे. धावडी गावातील सरपंच आणि पांडुरंगला बन्सी म्हणतो, तुम्ही नेहरु-गांधीजींचा फोटो ग्रामपंचायतमध्ये लावता, आंबेडकरांचा का लावत नाही? त्यावर सरपंच उध्दटपणे उत्तर देतो, आंबेडकरांचा फोटो नाही लावला, तुझे म्हणणे काय आहे?, तर पांडुरंग म्हणतो, हा आंबेडकर कोण? यातून या लोकांची कुजलेली मानसिकता दिसून येते. गावाच्या नदीवर जाण्यासही अस्पृश्यांना मनाई होती. तुमच्या लोकांसाठी खाली टिटवीचा डोह आहे, तिकडे कपडे धुत जा, असा गावाचा गुराखी दलितांना म्हणतो. यातून गावच्या गुराख्याची दलितांकडे पाहण्याची दृष्टी लक्षात येते. मधूला हाच गुराखी मांगाच्या संभूचा मुलगा मध्या अशा जातीवाचक नावाने संबोधतो. यातून जातीय सवतासुभा या मातीतच पोसला गेला आहे असे वाटते. तो तोडण्यासाठी बाबुराव गायकवाड यांनी समाजात समतेचा विचार मांडला आहे. येथे समता नांदावी व जातीयतेला मूठमाती मिळावी म्हणून त्यांनी कादंबऱ्यातून हे प्रश्न मांडलेले आहेत. डॉ. आंबेडकरांना अपेक्षित असलेले दलितत्त्वांचे विशाल व अतिशय निकोप जग गायकवाडांनी शब्दांकित केलेले आहे. कलाकृतीने केवळ रंजन करु नये, त्याऐवजी समाजप्रबोधन व वैचारिक बांधणीही त्यामधून घडून यावी,

**संदर्भ ग्रंथ**

१. आग - डॉ. बाबुराव गायकवाड, प्रतिमा प्रकाशन, पुणे.

२. झळ - डॉ. बाबुराव गायकवाड, श्रीस एजन्सी, मुंबई

३. दलित साहित्य : सिध्दांत आणि स्वरुप - डॉ. यशवंत मनोहर



Scanned with CamScanner